



दैनिक

**अचूक वेध, अचूक बातमी**

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com






वर्ष : ०५ | अंक : ३५१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.०१ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# खान्देशात आभाळ फाटलं, जवानांनी १ महिन्याच्या बाळाला पुरातून सुखरुप बचावलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, जळगाव :** महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सध्या मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडतोय. खान्देशातील जळगाव, धुळे या जिल्ह्यांम ध्ये अक्षरश: आभाळ फाटले आहे, अशा स्वरुपाचा पाऊस पडत आहे. हवामान विभागाकडून ३१ जुलैसाठी या जिल्ह्यांना पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. जळगावच्या अमळनेरमध्ये भीषण अवस्था बघायला मिळाली. मुसळधार पाऊस आणि बोरी नदीला आलेल्या पुरामुळे अमळनेरमध्ये घरांमध्ये पाणी शिरलं. जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं. अमळनेर तालुक्यात काही ठिकाणी गावांचा संपर्कदेखील तुटल्याची घटना समोर आली.

मुसळधार पावसामुळे अमळनेर शहरात सर्वत्र पाणी साचल्यामुळे प्रशासन अलर्ट मोडवर आलं. प्रशासनाकडून पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुरु करण्यात आलं. घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना प्रशासनाने रेस्क्यू ऑपरेशन करून घराच्या बाहेर काढले. यामध्ये एक महिन्याच्या बाळाचा देखील समावेश आहे. बचाव पथकाने सुरक्षितपणे एक महिन्याच्या बाळाचे सुखरुप रेस्क्यू केले.

**हातनूर धरणाचे सर्व दरवाजे उघडले...**

जळगाव जिल्ह्यासह हातनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक वाढली आहे. त्यामुळे प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून हातनूर धरणाचे सर्व ४१ रेडियल दरवाजे पूर्ण क्षमतेने उघडले आहेत. तापी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



**हातनूर धरणात किती टक्के पाणीसाठा?**

आज (३१ जुलै) दुपारी १२ वाजेच्या आकडेवारीनुसार हातनूर धरणाची पाणीपातळी २११.७५० म ीटर इतकी नोंदविण्यात आली असून, धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता २६८.५० दशलक्ष घनमीटर (६९.२० टक्के) तर उपयुक्त पाणीसाठा १३५.५० दशलक्ष घनमीटर (५३.१४ टक्के) इतका आहे. धरणातून ८,९२६ घनमीटर प्रति सेकंद (सुमारे ३,१५,२२२ क्युसेक्स) वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू असून, कालपासून पाणलोट क्षेत्रात ८६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हंगामातील एकूण पर्जन्यमान २५८ मिमी इतके झाले आहे. कालव्यामधून ५.६६ घनम ीटर प्रति सेकंद इतका विसर्ग सुरू असून आर.एस. गेटद्वारे कोणताही विसर्ग करण्यात आलेला नाही.

**तापीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा...**

धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात येत असल्याने तापी नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी नदीपात्रात जाणे टाळावे, जनावरे, शेतीची अवजारे आणि इतर साहित्य सुरक्षित ठिकाणी हलवावे. तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. परिस्थितीवर जलसंपदा विभाग आणि जिल्हा प्रशासनाचे सातत्याने लक्ष असून आवश्यकतेनुसार पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत.

**अमळनेर–जळगाव वाहतूक ठप्प**

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यांमध्ये गावांमध्ये पाणी शिरले आहे. यात अंमळनेर येथे जाणाऱ्या रेल्वेच्या बोगदा पूर्ण क्षमतेने सती माता मंदिराजवळ भरला असल्याने जळगावकडून अम ळनेरकडे जाणारी पाहणे आणि अम ळनेरकडून जळगावकडे येणारी वाहने सकाळपासून अडकून आहेत. तर पारोळा तालुक्यातील मसवी, मोंढळे या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरले असल्याने अनेक गावांचा संपर्क तुटलेला आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचं मोलाचं आवाहन...**

यावल, रावेर, अमळनेर, भुसावळ, जामनेर असेल प्रत्येक तालुक्यांमध्ये सतत आज सकाळपासून जोरदार पाऊस पडत आहे. जळगाव जिल्ह्यात कालपासूनच पाऊस सुरू असल्याने जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी नागरिकांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे. ज्या ठिकाणी नदीने धोक्याची पातळी ओलांडली असेल त्या नदीच्या आजूबाजूच्या गावांनी सतर्क राहावे. तसेच नदी, नाले पाण्याने भरले असल्याने त्या ठिकाणी गर्दी करु नये, असंदेखील आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

# पुण्यात सुरू करणार भाषा उत्कृष्टता अध्ययन केंद्र ; मंत्री उदय सामंत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, पुणे :** ‘दोन्ही राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाल्यास शिवसेनेला फरक पडणार नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) चंद्रबाबू नायडू, नितीश कुमार यांच्यापाठोपाठ एकनाथ शिंदे हे तिसऱ्या क्रमांकाचे नेते आहेत. ते आता राष्ट्रीय पातळीवर काम करीत आहेत. एकनाथ शिंदे काय करू शकतात, हे महाराष्ट्राने त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या काळात पाहिले आहे,’ अशी टिप्पणी उदय सामंत यांनी केली.

**राज्य सरकार स्वत: हे केंद्र पुण्यात सुरू करणार**

‘मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर या योजनेतील भाषा उत्कृष्टता अध्ययन केंद्रासाठी (सेंटर ऑफ एक्सलन्स) केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला होता. मात्र, आता केंद्र सरकारच्या निधीची वाट न पाहता राज्य सरकार स्वत: हे केंद्र पुण्यात सुरू करणार आहे,’ अशी घोषणा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत केली. ‘पुढील पाच ते सहा महिन्यांत या प्रकल्पाला सुरुवात होईल,’ असे त्यांनी सांगितले.

**मराठीला तीन ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात दर्जा जाहीर**

किमान दोन हजार वर्षांचा इतिहास आणि मूलतः अभिजात मराठीला केंद्र सरकारने तीन ऑक्टोबर २०२४ रोजी अभिजात दर्जा जाहीर केला. अभिजात भाषा निधीसाठी प्रस्ताव सादर करण्याची सूचना केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह



शेखावत यांनी केल्यानंतर राज्य सरकारने या योजनेतील ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’साठी केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला. त्याला मान्यता मिळाल्यानंतर निधीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार होता.

**या केंद्रासोबत मराठी विकास केंद्र जोडण्यात येणार**

या केंद्राबाबत आणि निधीबाबत विचारलेल्या प्रश्नावर सामंत म्हणाले, ‘केंद्र सरकारने अभिजात दर्जा दिलेल्या भाषांना किती निधी दिला, याचा आढावा घेतला आहे.

संस्कृतसाठी रामटेक येथील कालिदास विद्यापीठाला निधी मिळाला आहे. मात्र, या निधीची वाट न पाहता पुण्यात मराठी भाषा उत्कृष्टता अध्ययन केंद्र उभारण्याचा निर्णय भाषा सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाला मान्यता दिली आहे. या केंद्रासोबत मराठी विकास केंद्र जोडण्यात येणार आहे’

‘राज्यात केवळ मराठी भाषा सक्तीची असावी, ही राज्य सरकारची भूमिका आहे. पहिलीपासून हिंदी सक्तीचे धोरण आधीच्या सरकारच्या काळातील आहे,’ अशी टिप्पणी त्यांनी केली

# भानेगाव शिवारात बिबट्याची दहशत गर्भवती गाईच्या नरडीचा घेतला घोट

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.३१, नागपूर :** खापरखेडा येथून दोन किलोमीटर अंतरावरील भानेगाव शिवारात बिबट्याचा वावर असल्याचे पुन्हा एकदा निष्पन्न झाले असून गुरुवारी ३० जुलै रात्री १० वाजताच्या सुमारास बिबट्याने एका गर्भवती गाईवर हल्ला करून तिचा नरडीचा घोट घेतला. सदर घटनेमुळे भानेगाव परिसरात व शेतकरी वर्गात प्रचंड घबराट पसरली असून नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भानेगाव ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शिवहरी आसुटकर यांची गर्भवती गाय गुरुवारी रात्री शेताच्या परिसरात होती. रात्री १० वाजेच्या सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक गाईवर हल्ला चढवून नरडीचा घोट घेतला. याप्रसंगी गाईने जीव वाचवण्यासाठी फोडलेल्या हंबरड्याम ुळे जवळील मोकाट जनावरांमध्ये प्रचंड धावपळ उडाली व ती सैरावैरा पळत सुटली. यावेळी अंधाराचा फायदा घेत बिबट्याने तेथून पळ काढला. भानेगाव, साहोली आणि शिंगोरी परिसर हा बिबट्याच्या दहशतीखाली नवीन नाही, मागील अनेक महिन्यापासून या भागात बिबट्याचा वावर आहे. यापूर्वीही अनेकदा स्थानिक शेतकरी तसेच रात्रीच्या वेळी कार्यरत असलेल्या वेकोलि कर्मचाऱ्यांना बिबट्याचे थेट दर्शन झाले आहे. वनविभागा कडे पुरावे देखील देण्यात आले, शोध मोहीम राबविण्यात आली. मात्र बिबट्या जाळ्यात अडकला नाही.घटनेची सूचना खापा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना तात्काळ देण्यात आली. मात्र घटनास्थळी दाखल झालेल्या वन अधिकाऱ्यांनी गाईचे शवविच्छेदन करताच घाईघाईत मूठमाती देण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप गावकऱ्यांनी केला आहे. यावर शिवहरी आसुटकर व संतप्त ग्रामस्थांनी शवविच्छेदनाचा करण्याचा आग्रह केला. अखेर ग्रामस्थांच्या दबावानंतर वनविभागाने शवविच्छेदन करून गाईचा दफनविधी केला.

शिवहरी आसुटकर मुळात शेतकरी आहेत, त्यांचा दुग्ध व्यवसाय आहे शिवाय त्यांची गाय गर्भवती होती. त्यामूळे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्रशासनाने आर्थिक नुकसानभरपाई तात्काळ देण्यात यावी, तसेच बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करण्यात यावे, अशी जोरदार मागणी भानेगाव आणि परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे. यासंदर्भात खापा वनपरिक्षेत्र विभागाचे अधिकाऱ्यांशी संपर्क केला मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# विंचूरजवळ भीषण अपघात : छोटा हत्ती चालकाचा जागीच मृत्यू कांदा उत्पादक शेतकरी गंभीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**


**दि.३०, विंचूर (नाशिक) :** पिंपळस-येवला राज्य महामार्गावर विंचूरजवळ आज, गुरुवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास ट्रक आणि ‘छोटा हत्ती’ या मालवाहू वाहनादरम्यान भीषण अपघात झाला. या अपघातात छोटा हत्ती चालकाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, वाहनातील कांदा उत्पादक शेतकरी गंभीर जखमी झाले आहेत. ज्ञानेश्वर दगडू शिंदे (रा. वाकद) असे मृत चालकाचे नाव आहे. तर कांदा मालक शरद विठ्ठल गायकवाड (रा. वाकद) हे गंभीर जखमी झाले आहेत.

**ओव्हरटेकच्या प्रयत्नात काळाचा घाला**

मिळालेल्या माहितीनुसार, वाकद येथील ‘छोटा हत्ती’ वाहन (क्र. MH 43 BB 0310) कांदा विक्रीसाठी विंचूर परिसरातील माऊली वजन काटा व पेट्रोल पंपाजवळून जात होते. याच वेळी समोरून येणाऱ्या सोळा टायरी ट्रकने (क्र. CG 29 AG 5473) दुसऱ्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात छोटा हत्तीला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, छोटा हत्ती वाहन सुमारे दहा फूट फरफटत जाऊन रस्त्याच्या कडेला उलटले. यामध्ये वाहनाचा पार चक्काचूर झाला.

**स्थानिकांची तातडीने मदत!**

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. गंभीर जखमी शरद गायकवाड यांना तातडीने उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती




मिळताच लासलगाव पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. मृत ज्ञानेश्वर शिंदे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी निफाड ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. सहायक पोलीस निरीक्षक सागर कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बाळासाहेब कांदळकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**एकेरी वाहतूक अन् अपघातांची मालिका!**

सध्या पिंपळस-येवला राज्य महामार्गावर काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्याने अनेक ठिकाणी एकेरी वाहतूक (Single Lane) चालवली जात आहे. अरुंद रस्ता, अवजड वाहनांची अहोरात्र वर्दळ आणि चालकांची ओव्हरटेक करण्याची घाई यामुळे या भागात रोज अपघातांचे सत्र सुरू आहे. या मार्गावर तातडीने वाहतूक पोलीस तैनात करावेत, वेगमर्यादेची कठोर अंमलबजावणी करावी आणि सुरक्षिततेच्या योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी संतप्त मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# जिंतूर तहसील कार्यालय परिसर जलमय! प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

**अक्षराज; रहीम कोक्कर**

**दि.३१, जिंतूर :** जिंतूर शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तहसील कार्यालय परिसरातील मुद्रांक (स्टॅम्प) विक्रेत्यांच्या दुकानांसमोर अक्षरशः पाण्याचे तळे साचले आहे. तहसील कार्यालयात दररोज शेकडो नागरिक सातबारा, उत्पन्न, जात, अधिवास, नोंदणी, मुद्रांक खरेदी व इतर शासकीय कामांसाठी येत असतात. मात्र कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच पाणी साचल्याने नागरिकांना अक्षरशः पाण्यातून वाट काढत जावे लागत आहे. पावसाचे पाणी निचऱ्याअभावी मोठ्या प्रमाणात साचल्यामुळे मुद्रांक विक्रेत्यांच्या व्यवसायावरही परिणाम होत आहे. ग्राहकांना दुकानापर्यंत पोहोचण्यासाठी चिखल आणि साचलेल्या पाण्यातून चालावे लागत असल्याने अनेक जण त्रस्त झाले आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग आणि शेतकरी यांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती, दुर्गंधी आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयाच्या परिसरात अशी परिस्थिती निर्माण होणे हे प्रशासनाच्या नियोजनातील त्रुटी दर्शवणारे असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रत्येक पावसाळ्यात हीच समस्या निर्माण होते. पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी योग्य नाले, गटारी व निचऱ्याची व्यवस्था नसल्याने संपूर्ण परिसर जलमय होतो. त्यामुळे संबंधित विभागाने कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दरम्यान, या समस्येकडे तहसील प्रशासन, नगर परिषद आणि संबंधित बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन साचलेल्या पाण्याचा निचरा करावा, परिसर स्वच्छ करावा आणि भविष्यात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिक, मुद्रांक विक्रेते आणि वकिलांकडून होत आहे.

# खा.धानोरकर यांनी दिल्लीत नितीन गडकरींची भेट घेऊन मांडल्या शेतकऱ्यांच्या समस्या

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** खा.प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी राजुरा-बल्लारपूर परिसरातील शेतकऱ्यांचे गंभीर प्रश्न मांडले. महामार्गाच्या बांधकामामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे यावर तातडीने मार्ग काढण्याची मागणी त्यांनी केली.

राजुरा-बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील राष्ट्रीय महामार्ग (एनएच ९३०-ड) आणि राजुरा- हैद्राबाद महामार्गाच्या बांधकामामुळे शेतकरी व स्थानिक नागरिकांना विविध समस्या भेडसावत आहे. राष्ट्रीय महामार्गाची उंची २५ ते ३० फुटांपर्यंत वाढल्यामुळे मौजा राजुरा येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कोणताही मार्ग उरलेला नाही. एका बाजुला रेल्वे मार्ग आणि दुसऱ्या बाजुला वर्धा नदीचा किनारा असल्यामुळे शेतकरी सर्व बाजुंनी वेढले गेले आहेत. त्यामुळे शेती साहित्य व बैलगाड्यांच्या वाहतुकीसाठी तातडीने अंडरपास आणि सर्व्हिस रोड उपलब्ध करुन देण्याची आग्रही मागणी खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महाम ार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

तसेच वर्धा नदी ते कोतपल्लीवार पेट्रोल



पंपाजवळील रस्त्याच्या दोन्ही बाजुंना सर्व्हिस रोडसह राजुरा- बल्लारपूर येण्या-जाण्यासाठी ' एन्ट्री -एक्झिट पॉईंट' देणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सर्व्हिस रोड नसल्यास केवळ शेतकऱ्यांनाच नव्हे, तर वर्धा नदीकाठी होणारी छटपूजा, दुर्गा विसर्जन, आणि संमक्का-सरक्का यात्रेतील भाविकानांही मोठा त्रास सहन करावा लागेल, याकडे त्यांनी लक्ष वेधले. याशिवाय पावसाळ्यात शेतात पाणी साचू नये यासाठी योग्य ड्रेनेज व्यवस्था, संरक्षक भिंत उभारणे आणि उच्च न्यायालयाच्या आदेशांचे तातडीने पालन करण्याची मागणी करण्यात आली.

यासोबतच वरोरा- चंद्रपूर रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने, या कामाची तातडीने तपासणी करुन संबंधित कंत्राटदारावर कडक कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.




## श्रेष्ठ साहित्यिक आणि लेखन प्रेरणा दिन

महामानवांचा जीवन लढा,महामानवांचे संघर्षमय जीवन,महामानवांचे मानवतावादी अमूल्य विचार आणि महामानवांचे मानवतावादी अलौकिक असे सामाजिक कार्य या गोष्टी लक्षात घेऊन त्यांचे जयंती दिन आणि त्यांच्या लक्षणीय अशा कार्याचे स्मरण राहावे म्हणून विविध दिन साजरा केले जातात. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा ज्या दिवशी राज्याभिषेक झाला होता तो दिवस ६ जून शिवराज्याभिषेक दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.११ एप्रिलला महात्मा फुले यांचा जयंती दिन हा शिक्षण हक्क दिन म्हणून साजरा केला जातो.२६ जूनला आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केली जाते.७ नोव्हेंबरला भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश झाला होता म्हणून हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा केला जातो. आणि भारताचे मिसाईल मॅन तथा माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचा १५ ऑक्टोबर जयंती दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो.अशा महत्त्वाच्या दिनांमध्ये आणखी एका दिनाची लक्षणीय व प्रेरणादायी भर पडली आहे विद्रोही विचारवंत,थोर समाजसुधारक, कामगार चळवळीचे खंदे समर्थक, साहित्यसम्राट,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती दिन १ ऑगस्ट हा दिवस यावर्षी पासून लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जात आहे.ही बाब अतिशय प्रेरणादायी असून तितकीच अभिमानाची गोष्ट आहे. कमाल मर्यादेची सामाजिक व आर्थिक विषमता,जाती प्रथेची अमानुष व्यवस्था आणि उच्च वर्णियांच्या वर्चस्वाला बळी पडल्याने बालवयाचे अण्णाभाऊ साठे केवळ दिड दिवस शाळा शिकतात,वडील भाऊराव साठे रोजगाराच्या शोधात मुंबईला जायचे तेव्हा अण्णाभाऊ बहिणभावांना सांभाळतात,अनेकवेळा आईच्या सोबत मजुरीचे कामे करतात.१९३१ मध्ये वाटेगावात आणि परिसरात मोठा दुष्काळ पडला होता.गावात हाताला काम मिळत नव्हते.कुटुंबाची उपासमार होऊ लागली होती.ही बाब लक्षात घेऊन भाऊराव साठे यांनी कुटुंबासह मुंबईचा रस्ता धरला. वाटेगाव ते मुंबई हा प्रवास त्यांनी पायी चालत पूर्ण केला आणि एकदाची मुंबई गाठली.या प्रवासात त्यांना अनेक कटु अनुभव अनुभवायला मिळाले. मुंबईत स्थायिक झालेल्या अण्णाभाऊ साठे यांनी सुरुवातीला मिळतील ती कामे केली आणि आईवडिलांना मदत केली.नंतर ते मोरबाग गिरणी मध्ये काम करू लागले. गिरणी कामगार म्हणून काम करताना त्यांनी कामगारांचे जीवन आणि संघर्ष जवळून पाहिले. मुंबई कोणाची?हे नाटक लिहून व ते विविध ठिकाणी सादर करून त्यांनी कामगार व मजुरांमध्ये जनजागृती केली .शाहिरी कवने लिहिली.काव्यलेखन करुन,पोवाडे गाऊन त्यांनी प्रभावीपणे समाजप्रबोधन सुरू केले.त्याचवेळी ते सामाजिक कार्याकडे वळले आणि कामगारांच्या,सामान्य जनतेच्या हक्कांसाठी लेखन करू लागले व लढा देऊ लागले. फक्त दीड दिवस शाळा शिकणारे अण्णाभाऊ साठे समाज सुधारणेसाठी, लोकांच्या कल्याणासाठी,महिलांच्या सन्मानासाठी प्रभावी असे लेखन करू लागले.त्यांनी त्यांच्या लेखनातून इथल्या व्यवस्थेला वेशीवर टांगले,सामाजिक विषमतेवर प्रहार केले,आर्थिक विषमतेचे धिंडवडे काढले,जातीयतेला खिंडार पाडले आणि स्त्रिया शोभेच्या बाहुल्या नसून,स्त्रिया केवळ उपभोगाची वस्तू नसून त्या अन्यायाविरुद्ध बंड करून कणखरपणे लढणाऱ्या रागिणी आहेत,अन्याय अत्याचाराविरुद्ध पेटून उठणाऱ्या ज्वाला आहेत हे जगाला ठणकावून सांगितले.त्यांनी अनेक दर्जेदार पुस्तकांचे विपुल आणि समृध्द असे लेखन केले.जनजागृतीसाठी पोवाडे लिहिले,काव्ये लिहिली. कथासंग्रह लिहिले,कादंबऱ्या लिहिल्या, व्यक्तिरेखा रेखाटल्या,प्रवासवर्णने लिहिली आणि प्रभावी लोकनाट्ये सुध्दा लिहिली.त्यांनी फकिरा ही कादंबरी समतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली.फकिरा कादंबरीचा नायक विषमतेविरुध्द बंड पुकारतो,हक्कांसाठी लढतो,समतेसाठी निडरपणे उभा राहतो.वैजयंता व चित्रा या कादंबरीतून त्यांनी महिलांचे नेतृत्व, कर्तृत्व आणि बाणेदारपणा जगासमोर आणला.माझा रशियाचा प्रवास या पुस्तकातून त्यांनी मार्मिकपणे लेखन करून मराठी साहित्य जगतात आपल्या लेखनाचा आगळावेगळा ठसा निर्माण केला आहे.ते खरोखर साहित्यसम्राट म्हणून शोभतात.त्यांनी केलेले समाज सुधारणेचे कार्य,त्यांचे मानवता पेरणारे विचार आणि समतेसाठीचा अविरत संघर्ष अतिशय प्रेरणादायी आहेत.

नेमकी हीच बाब लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने सन २०२६ पासून साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जयंती दिन १ ऑगस्ट हा दिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे.ही बाब आपल्या सर्वांसाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.तेव्हा विद्यार्थ्यांनी व समस्त भारतीय नागरिकांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुस्तकांचे खूप खूप वाचन करावे.त्यांचे लेखन साहित्य वाचून,त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन स्वतः लेखन करावे.विपुल असे लेखन करून सामाजिक सुधारणा करणारे महान विचारवंत अण्णाभाऊ साठे यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन!त्यांच्या लेखन साहित्याला मानाचा मुजरा!

**- बबन दामोदर गुळवे**

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

आज १ ऑगस्ट, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज १०६ वि जयंती. मराठी मातीत जन्मलेलं एक अनमोल रत्न म्हणजे अण्णाभाऊ साठे. अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शिधोजी साठे तर आईचे नाव वालुबाई. त्यांचे मूळ नाव तुकाराम असे होते. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची व हलाखीची त्यामुळे त्यांना शिक्षण घेता आले नाही. अण्णाभाऊ केवळ दीड दिवस शाळेत गेले बाकीचे सर्व शिक्षण मुंबईच्या झोपडपट्टीत झाले.

मुंबईत सुरवातीला त्यांनी मिळेल ती कामे केली नंतर त्यांना मुंबईतील गिरणीमध्ये झाडूवाल्याची नोकरी मिळाली. तिथेच त्यांना कामगारांच्या कष्टमय, दुःखमय जीवनाचे दर्शन झाले. कामगारांचे, संप, मोर्चे पाहून त्यांनी त्यांचा लढाऊपणाही अनुभवला. १९३६ साली कामगार नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांनी प्रभावित होऊन ते कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते बनले. मुंबईत त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे ऐकली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी ते इतके प्रभावीत झाले की त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरू मानले.

वडीलांच्या निधनानंतर घरची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यानंतर ते पुन्हा१ गावी आले. तिथे बापू साठे या त्यांच्या चुलतभावाच्या तमाशा फडात ते काम करू लागले. १९४२ च्या आंदोलनात सहभागी झाल्याने त्यांच्यावर पोलिसांनी पकड वारंट काढले. पोलिसांना चुकवत ते पुन्हा मुंबईला आले. मुंबईत आल्यावर लोकशाहीर म्हणून ते नावारूपास आले. १९४४ साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लाल बावटा या कलापथकाची त्यांनी स्थापना केली. पुढे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग घेतला. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, लोकनाट्ये यांचा समावेश असे. महाराष्ट्राची परंपरा, मुंबई कोणाची? ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्ये खूप गाजली. अकलेची गोष्ट, देशभक्त घोटाळे, बेकायदेशीर, पुढारी मिळाला यासारखी त्यांनी लिहिलेली अनेक वगनाट्य लोकप्रिय झाली. अण्णाभाऊंच्या साहित्यात कथा कादंबरीची निर्मिती ठळकपणे नजरेत भरते.

जिवंत काडतुसे, आबी, खुलंवाडी, बरबाद्या कंजारी, चिरागनगरची भुते, कृष्णाकाठच्या कथा हे त्यांनी लिहिलेले कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. अण्णाभाऊंनी ३५ कादंबऱ्या लिहिल्या. चित्रा, फकिरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, रानगंगा, चिखलातील कमळ,




वैजयंता या त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या खूप गाजल्या. फकिरा या त्यांच्या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला. फकिरा ही आजही सर्वाधिक विकली जाणारी कादंबरी आहे. अनेक विद्यापीठात या कादंबरीचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जो व्यक्ती अवघे दीड दिवस शाळेत गेला त्या व्यक्तीची साहित्य संपदा विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आली हा आधुनिक युगातील एक चमत्कार आहे. म्हणूनच अण्णाभाऊ हे आधुनिक युगातील साहित्यरत्न आहे. त्यांच्या काही कादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले. उपेक्षित गुन्हेगार म्हणून कलंकित ठरवले गेलेले दलित आणि श्रमिक यांच्या समृद्धीचे स्वप्न अण्णाभाऊ पाहत होते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या लढाऊ आणि विमोचक विचारांचे संस्कार त्यांच्या मनावर खोलवर झालेले होते. जग बदल घालुनी घाव! सांगून गेले मज भीम राव! हे त्यांचे गीत खूप गाजले. माझी मैना गावाकडं राहिली... ही त्यांची लावणी तर अविस्मरणीय आहे. पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे ते नेहमी म्हणत. मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, दुःख, दारिद्र्य त्यांच्या साहित्यातून प्रकट होते.

जगातील सत्तावीस भाषांमध्ये अण्णाभाऊंच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. १९५७ साली झालेल्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. महाराष्ट्रातील विद्यापीठांत अण्णाभाऊंवर अकरा प्रबंध प्रसिद्ध केले गेले आहेत. पुणे विद्यापीठात त्यांच्या सन्मानार्थ अण्णाभाऊ साठे अध्यासन सुरू करण्यात आले आहे. असा हा पददलितांच्या जीवनावर वास्तव लिहिणारा साहित्यरत्न १८ जुलै १९६९ रोजी कालवश झाला. आज त्यांची १०६ वि जयंती त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**९९२२५४६२९५**

# अण्णाभाऊ साठे : लेखनाची प्रेरणा

समाजातील उपेक्षित, शोषित आणि वंचित घटकांच्या जीवनाला आपल्या सशक्त लेखणीतून शब्दबद्ध करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे मराठी साहित्यातील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या साहित्याने केवळ मराठी साहित्य समृद्ध केले नाही, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळही अधिक व्यापक केली. त्यांनी आयुष्यभर लेखणीला समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन मानले आणि साहित्याच्या माध्यमातून अन्याय, विषमता, गरिबी, शोषण आणि मानवी वेदना यांना वाचा फोडली. म्हणूनच त्यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण आणि नव्या पिढीमध्ये लेखनाची प्रेरणा जागविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिन 'लेखन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमामागील मूलभूत हेतू म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने, प्रत्येक तरुणाने आणि प्रत्येक संवेदनशील नागरिकाने लेखनाच्या माध्यमातून समाजाशी नाते जोडावे, आपले विचार सुसंस्कृतपणे व्यक्त करावेत आणि मराठी साहित्यविश्व अधिक समृद्ध करावे हा आहे. शासन परिपत्रकातही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ समाजातील सर्व स्तरांतील प्रतिभावंतांना लेखनाची प्रेरणा मिळावी आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विविध साहित्यिक उपक्रम आयोजित व्हावेत.

१ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्मलेल्या अण्णाभाऊ साठे यांचे बालपण अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गेले. त्यांना शालेय शिक्षण फारसे घेता आले नाही; परंतु जीवनाच्या कठीण अनुभवांनी त्यांना घडविले. परिस्थितीमुळे त्यांचे कुटुंब मुंबईत स्थलांतरित झाले. गिरणगावातील कष्टकरी जीवन, झोपडपट्ट्यांतील संघर्ष, कामगारांचे हाल, जातीय विषमता आणि सामाजिक अन्याय त्यांनी अत्यंत जवळून अनुभवला. याच अनुभवांनी त्यांच्या साहित्याला वास्तववादी स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी पुस्तकांमधून जितके शिकले, त्याहून अधिक समाजातून शिकले. त्यामुळे त्यांचे साहित्य कृत्रिम न वाटता जिवंत जीवनाचा आरसा बनले. त्यांनी कधीही राजवाड्यांतील वैभवाची कथा लिहिली नाही; त्यांनी झोपडीतील माणसाचे अश्रू, घाम आणि संघर्ष यांनाच आपल्या साहित्याचा केंद्रबिंदू बनविले. अण्णाभाऊ साठे हे लोकशाहीर म्हणून जितके लोकप्रिय होते तितकेच ते एक समर्थ कादंबरीकार, कथाकार, लोकनाट्यकार आणि सामाजिक विचारवंत होते. त्यांनी विविध साहित्यप्रकारांत विपुल लेखन केले. त्यांच्या साहित्यामध्ये श्रमिक, दलित, स्थलांतरित, शेतमजूर, स्त्रिया, कष्टकरी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहिलेल्या माणसांचे जीवन अत्यंत प्रभावीपणे चित्रित झाले आहे. त्यांनी साहित्याला केवळ सौंदर्याचा विषय न मानता समाजपरिवर्तनाचे प्रभावी शस्त्र बनविले. त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीत संघर्ष आहे, स्वाभिमान आहे, मानवी प्रतिष्ठेचा आग्रह आहे आणि समतेचा संदेश आहे.

त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीने मराठी साहित्याला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध झुंज देणाऱ्या सामान्य माणसाच्या संघर्षाचे चित्रण करणारी ही कादंबरी आजही सामाजिक साहित्याचा मानदंड मानली जाते. त्याचप्रमाणे त्यांच्या असंख्य कथा, पोवाडे, लावण्या आणि लोकनाट्यांनी जनतेमध्ये सामाजिक जाणीव निर्माण केली. लोकभाषेतील सहजता, कथनातील ओघवतेपणा आणि वास्तववादी आशय यामुळे त्यांचे साहित्य सर्वसामान्यांच्या मनात घर करून राहिले. त्यांनी लोककलेला परिवर्तनाची दिशा दिली आणि शाहिरीला सामाजिक बांधिलकीचे स्वरूप प्राप्त करून दिले. अण्णाभाऊ साठे यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कधीही स्वतःच्या वैयक्तिक यशासाठी लेखन केले नाही. त्यांच्या लेखणीचा उद्देश समाजातील अन्याय उघड करणे, वंचितांच्या भावना व्यक्त करणे आणि सामान्य माणसाला आत्मविश्वास देणे हा होता. त्यांनी आपल्या साहित्यामधून स्वाभिमान, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा सातत्याने पुरस्कार केला. त्यांच्या मते लेखक हा समाजाचा जागरूक प्रहरी असतो. तो केवळ घटनांचे वर्णन करत नाही, तर समाजाला विचार करायला भाग पाडतो. त्यामुळे त्यांचे साहित्य आजही तितकेच समकालीन आणि प्रेरणादायी वाटते. आजच्या डिजिटल युगात अभिव्यक्तीची अनेक माध्यमे उपलब्ध झाली आहेत. सामाजिक माध्यमे, संकेतस्थळे, ब्लॉग, ई-पुस्तके आणि विविध डिजिटल व्यासपीठांमुळे प्रत्येकाला आपले विचार मांडण्याची संधी मिळाली आहे. मात्र अभिव्यक्तीची ही संधी जबाबदारीने वापरणे तितकेच महत्त्वाचे आहे. माहितीचा वेग वाढला असला तरी विचारांची खोली कमी होत असल्याची खंत अनेक साहित्यिक व्यक्त करतात. अशा काळात अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य आपल्याला शिकवते की लेखन हे केवळ प्रसिद्धी मिळविण्याचे साधन नसून समाजाप्रती असलेल्या उत्तरदायित्वाची अभिव्यक्ती आहे. लेखकाने सत्याचा शोध घेतला पाहिजे, मानवी मूल्यांचा सन्मान केला पाहिजे आणि समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी लेखणीचा उपयोग केला पाहिजे. याच व्यापक विचारातून महाराष्ट्र शासनाने 'लेखन प्रेरणा दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. शासन परिपत्रकानुसार विद्यापीठे, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांच्या मुलाखती व व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या उपक्रमांचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी, लेखनाची आवड आणि साहित्यिक संवेदनशीलता विकसित करणे हा आहे. लेखन ही केवळ शब्दांची मांडणी नसते; ती विचारांची शिस्त, संवेदनशीलतेची अभिव्यक्ती आणि समाजाशी असलेल्या नात्याची जाणीव असते. जेव्हा एखादा विद्यार्थी कविता लिहितो, कथा रचतो, निबंध मांडतो किंवा एखाद्या सामाजिक विषयावर आपले मत व्यक्त करतो, तेव्हा तो केवळ लेखन करत नसतो; तो आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही करत असतो. लेखनामुळे निरीक्षणशक्ती वाढते, चिकित्सक दृष्टी विकसित होते, भाषेवर प्रभुत्व मिळते आणि समाजातील विविध प्रश्नांकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता निर्माण होते. म्हणूनच 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून विचारक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडविण्याचा एक प्रभावी सामाजिक उपक्रम आहे. आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल माध्यमे आणि सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अभिव्यक्तीची साधने बदलली असली तरी प्रभावी लेखनाचे महत्त्व अजिबात कमी झालेले नाही. उलट माहितीच्या प्रचंड प्रवाहात सत्य, विवेक, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारी जपणारे लेखन अधिक आवश्यक बनले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळात लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र बनविले; आजच्या पिढीने तीच लेखणी ज्ञान, विज्ञान, लोकशाही, संविधानिक मूल्ये आणि मानवी संवेदनशीलता यांची वाहक बनविण्याची गरज आहे. लेखन प्रेरणा दिनाचा खरा अर्थ केवळ लेखनस्पर्धा आयोजित करणे एवढाच नसून विद्यार्थ्यांमध्ये प्रश्न विचारण्याची वृत्ती, चिकित्सक विचारसरणी, कल्पकता आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे हा आहे.लेखन ही एक सर्जनशील प्रक्रिया आहे. ती माणसाला स्वतःशी संवाद साधायला शिकवते. वाचनातून विचार जन्माला येतात आणि विचारांमधून लेखन घडते. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा प्रत्यक्षात वाचन संस्कृतीलाही बळ देणारा उपक्रम आहे. ज्या समाजात वाचनाची सवय दृढ असते, त्या समाजात विचारांची देवाणघेवाण समृद्ध होते, मतभिन्नतेचा आदर वाढतो आणि लोकशाही अधिक मजबूत होते. अण्णाभाऊ साठे यांनी स्वतः औपचारिक शिक्षणाची मर्यादा असतानाही सातत्याने वाचन, निरीक्षण आणि अनुभव यांच्या बळावर स्वतःला घडविले. त्यामुळे त्यांचे जीवन प्रत्येक विद्यार्थ्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी जिद्द, जिज्ञासा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या जोरावर मोठे साहित्य निर्माण करता येते.

आज शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये लेखन कौशल्य विकसित करण्यासाठी विविध उपक्रमांची आवश्यकता आहे. शासनाच्या परिपत्रकातही कविता, कथा, निबंध लेखन स्पर्धा, वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा, स्थानिक साहित्यिकांची व्याख्याने, ग्रंथदिंडी, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वाचन, त्यांच्या व्यक्तिमत्त्व व साहित्यावर चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा आणि साहित्य संमेलनांचे आयोजन करण्यावर भर देण्यात आला आहे. हे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना देतात, भाषिक कौशल्य वाढवितात आणि साहित्याबद्दल आत्मीयता निर्माण करतात. लेखनाची खरी प्रेरणा पुरस्कारातून नव्हे, तर समाजाशी असलेल्या नात्यातून निर्माण होते. जेव्हा लेखक समाजातील वेदना अनुभवतो, सामान्य माणसाच्या आशा-आकांक्षा समजून घेतो आणि त्या प्रामाणिकपणे शब्दबद्ध करतो, तेव्हा त्याचे साहित्य काळाच्या कसोटीवर टिकते. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य याच कारणामुळे आजही अभ्यासले जाते. त्यांनी कधीही कल्पनारम्य वैभवाचे चित्र रंगविले नाही; त्यांनी वास्तवाला शब्द दिले. त्यांच्या लेखनातील पात्रे ही संघर्ष करणारी, स्वाभिमान जपणारी आणि परिवर्तनाची स्वप्ने पाहणारी माणसे आहेत. त्यामुळे त्यांचे साहित्य केवळ एका समाजघटकाचे प्रतिनिधित्व करत नाही, तर संपूर्ण मानवतेच्या संघर्षाची गाथा बनते.

मराठी भाषा ही संत, समाजसुधारक, विचारवंत आणि साहित्यिक यांच्या समृद्ध परंपरेने घडलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कुसुमाग्रज, पु. ल. देशपांडे, विंदा करंदीकर आणि अण्णाभाऊ साठे यांसारख्या अनेक थोर व्यक्तींनी आपल्या लेखणीतून समाजमन घडविले. या परंपरेचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे. लेखन प्रेरणा दिन हा त्या जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने, संशोधकाने, शिक्षकाने आणि साहित्यप्रेमीने आपल्या अनुभवांना, निरीक्षणांना आणि विचारांना शब्दरूप देण्याचा संकल्प या दिवशी करणे आवश्यक आहे.

लेखन ही समाजपरिवर्तनाची शांत पण अत्यंत प्रभावी प्रक्रिया आहे. तलवारीने जिंकलेली मने काळानुसार बदलतात; परंतु विचारांनी जिंकलेली मने कायमस्वरूपी परिवर्तन घडवितात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून हेच सिद्ध करून दाखविले. त्यांच्या लेखणीत संघर्ष होता, पण द्वेष नव्हता; विद्रोह होता, पण विध्वंस नव्हता; अन्यायाविरुद्ध प्रखर आवाज होता, पण मानवतेवरील विश्वास कधीही डळमळला नाही. म्हणूनच त्यांचे साहित्य आजही सामाजिक समता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रभावी प्रतीक मानले जाते.

आजच्या काळात लेखन केवळ साहित्यनिर्मितीपुरते मर्यादित राहिलेले नाही. संशोधन, पत्रकारिता, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, न्यायव्यवस्था, शिक्षण, उद्योग, सामाजिक कार्य आणि डिजिटल माध्यमे अशा प्रत्येक क्षेत्रात प्रभावी लेखनाचे महत्त्व वाढत आहे. विचार स्पष्टपणे आणि जबाबदारीने मांडण्याची क्षमता ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली आहे. त्यामुळे लेखन प्रेरणा दिन हा केवळ साहित्यिक कार्यक्रम नसून ज्ञानाधिष्ठित समाज निर्माण करण्याच्या व्यापक ध्येयाशी जोडलेला उपक्रम आहे.

अण्णाभाऊ साठे यांचे जीवन हे आशावाद, संघर्ष आणि सर्जनशीलतेचा प्रेरणादायी प्रवास आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी जागतिक कीर्तीचे साहित्यिक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांनी सिद्ध केले की लेखक घडण्यासाठी संपन्न साधने नव्हे, तर जिद्द, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी आवश्यक असते. त्यांचे संपूर्ण जीवन नवोदित लेखकांसाठी एक प्रेरणादायी विद्यापीठ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहिताचे, मानवतावादी मूल्यांचे आणि सत्यनिष्ठेचे लेखन करणे.

१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा 'लेखन प्रेरणा दिन' हा केवळ एका महान साहित्यिकाच्या जयंतीचे औचित्य नसून विचार, वाचन, लेखन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा उत्सव आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत, प्रत्येक ग्रंथालयात आणि प्रत्येक घरात या दिवसाच्या निमित्ताने वाचनाची, चिंतनाची आणि लेखनाची नवी चळवळ सुरू झाली, तर तीच अण्णाभाऊ साठे यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या लेखणीने पेटविलेली सामाजिक जागृतीची मशाल आजच्या पिढीने ज्ञान, समता, न्याय आणि मानवतेच्या प्रकाशाने अधिक तेजस्वी करावी, हाच 'लेखन प्रेरणा दिनाचा' खरा संदेश आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**

## साठे लेखणी

प्रतिभा संपन्न साजे
अण्णाभाऊ लेखणी
डौलअसे अलौकिक
नाही दुसरी देखणी

कालातीत दूर दर्शी
फिक्या पडे दुर्बिणी
निळी, शाई सळाळे
जणू करारी वाघिणी

अवघड विषय सोपा
अशीचं करी मांडणी
काळजा भिडे भाषा
विविध अंगी धाटणी

दीनदलितदुर्बलास्तव
सुसज्ज रण रागिणी
समाज प्रबोधन साधे
घावघालताना ऐरणी

तेज तर्रार आवेष तो
हिरा छेदक हिरकणी
दिशा दाई पिढ्यांना
प्रतिमा स्वच्छ दर्पणी

जया जी कळे भाषा
तशी तिची ती वाणी
प्रस्थापिताना पाजले
रे अशिक्षिताने पाणी

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# जी.एच.राजपूत यांची किन्होळा येथे प्राचार्यपदी पदोन्नती



**अक्षराज : प्रतिनिधी**


**दि.३१, बुलडाणा :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित श्री शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय किन्होळा येथे जी.एच.राजपूत यांची प्राचार्यपदी संस्थेच्या आदेशान्वये नुकतीच पदोन्नती करण्यात आली आहे. या अगोदर त्यांनी अंचरवाडी, हतेडी व श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथे दीर्घकाळ सेवा दिल्यानंतर त्यांची पदोन्नती श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय चिखली येथे उपप्राचार्य पदी झाली होती. त्यांनी त्यांच्या सेवाकाळात अतिशय चांगल्या प्रकारे शैक्षणिक कार्य केलेले आहे, त्याचीच पावती म्हणून त्यांना त्यांच्या जन्मभूमी किन्होळा येथे प्राचार्य पदी बढती देण्यात आली. श्री राजपूत किन्होळा गावचे भूमिपुत्र असून त्याच शाळेत पाचवी ते दहावीपर्यंत विद्यार्थी म्हणून शिक्षण घेतलेले आहे. त्या गावातील व शाळेतील विद्यार्थी प्रथमतः प्राचार्य पदावर बसण्याचा बहुमान श्री राजपूत सरांना प्राप्त झाला आहे. त्यांची प्राचार्य पदी नियुक्ती झाल्यानंतर संपूर्ण गावामध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे सर्व ग्रामस्थांनी त्याचबरोबर वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व मंडळींनी त्यांच्या नियुक्ती बद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुद्धा शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे त्यांच्या कार्यकाळात या विद्यालयाला पूर्वीचे गतवैभव प्राप्त होईल असा आशावाद सर्व ग्रामस्थ मंडळी व सहकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# उल्हासनगरात ४२५ ग्रॅम गांजासह एकास अटक; मध्यवर्ती पोलिसांची कारवाई

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.३१, उल्हासनगर (ठाणे) :** अमली पदार्थांच्या तस्करी विरोधातील कारवाईत मध्यवर्ती पोलिसांनी विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकाजवळील शास्त्रीनगर परिसरातून ४२५ ग्रॅम गांजासह एका आरोपीला अटक केली. किरण सुभाष वाघमारे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याविरुद्ध संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. झडती दरम्यान त्याच्याकडून ४२५ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे, याच परिसरातून १० दिवसांपूर्वीही एका अमली पदार्थ विक्रेत्याला अटक करण्यात आली होती. त्यामुळे या भागातील अमली पदार्थांच्या पुरवठा साखळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढवली आहे. अमली पदार्थांच्या विक्री आणि तस्करीविरोधातील कारवाया पुढेही सुरू राहणार असून, संशयास्पद हालचालींची माहिती तात्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे.

# उपनिबंधक कार्यालय विरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकणार - गणेशराव रोकडे



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२९, पालम (परभणी) :** वाडी खुर्द येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सदस्यत्व प्रकरणात विभागीय सहनिबंधक यांनी आपल्याला दिलासा दिल्यानंतर आता पालम येथील उपनिबंधक कार्यालयाविरोधात उच्च न्यायालयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याची घोषणा गणेशराव रोकडे (दादा) यांनी केली.

नुकतीच पालम येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. गणेशराव रोकडे यांनी सांगितले की, पालम उपनिबंधक कार्यालयाने त्यांचे सोसायटीचे सदस्यत्व रद्द करण्याचा निर्णय दिला होता. या निर्णयाविरोधात त्यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर विभागाकडे अपील केले. विभागीय सहनिबंधक संतोष बिडवई यांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर दि.१३ जुलै २०२६ रोजी उपनिबंधकांचा निर्णय रद्द करत त्यांचे सदस्यत्व पूर्ववत कायम ठेवले. रोकडे यांनी आरोप केला की, सदस्यत्व रद्द केल्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची संधी त्यांना गमवावी लागली. हा निर्णय राजकीय आकसातून घेण्यात आला असून त्यामुळे त्यांचे राजकीय व मानसिक नुकसान झाले असल्याचा दावा त्यांनी केला. उपनिबंधक कार्यालयाच्या चुकीच्या आणि पक्षपाती कारभारामुळे लोकशाही प्रक्रियेत सहभागी होण्याचा अधिकार हिरावला गेला. त्यामुळे झालेल्या मानसिक, सामाजिक व राजकीय नुकसानीबाबत न्याय मिळविण्यासाठी लवकरच उच्च न्यायालयात उपनिबंधक कार्यालयाविरोधात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

# स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३१, शिरपूर (धुळे) :** शिरपूर तालुक्यातील तऱ्हाड कसबे येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालयात महाकाव्य महाभारताचे रचयिता महर्षी व्यास यांच्या जयंतीनिमित्त गुरुपौर्णिमेचा सण अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.एन.धनराज हे होते. त्यांच्या शुभहस्ते सरस्वती माता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले.

गुरूंचे महत्त्व आणि आजच्या काळातील वास्तव कार्यक्रम प्रसंगी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विविध उदाहरणे दिली :-

एस. एस. पाटील यांनी महर्षी व्यास यांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंगांवर प्रकाश टाकला. बी.एन.देशमुख यांनी सुंदर गोष्टीच्या माध्यमातून गुरूचे महत्त्व पटवून दिले. एम.आर.पगारे यांनी प्राचीन काळातील समृद्ध 'गुरु-शिष्य परंपरा' स्पष्ट करत, आजच्या आधुनिक युगात गुरूची जागा मोबाईलने घेतली आहे, याविषयीची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक डी.एन.धनराज यांनी महाभारतातील गुरु द्रोणाचार्य आणि त्यांचे आदर्श शिष्य एकलव्य यांच्या जीवनावरील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना अभ्यासात व जीवनात निष्ठा राखण्याचे अनमोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. बी. बंजारा यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डी. के. कोळी यांनी मानले. या प्रसंगी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी डी.ए.गिरासे, एस.आर.बाविस्कर, आर.एम. कुंवर, गुलाब अहिरे आणि भूषण पाटील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# बहुचर्चित सिस्पे घोटाळ्यातील प्रमुख आरोपी राहुल काळोखेचे भारतात प्रत्यार्पण

## अहिल्यानगर पोलिसांनी मुंबईत घेतले ताब्यात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** बहुचर्चित कोट्यवधी रुपयांच्या सिस्पे, इनफिनाईट बिकन व इतर कंपन्यांच्या आर्थिक घोटाळा गुन्ह्यातील प्रमुख संशयित आरोपी राहुल शामराव काळोखे याला मुंबई विमानतळावर अहिल्यानगर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याला पोलीस पथक अहिल्यानगरला घेऊन येत आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी या माहितीला दुजोरा दिला. दरम्यान खासदार निलेश लंके यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी राहुल काळोखे याला फिजी देशामध्ये इंटरपोलने अटक करून भारतात प्रत्यार्पण केले.

या आर्थिक घोटाळ्याप्रकरणी श्रीगोंदा, सुपा आणि तोफखाना पोलीस ठाण्यांत सिस्पे, इनफिनाईट बिकन व इतर कंपन्यांविरोधात एकूण चार गुन्हे दाखल आहेत.

या सर्व गुन्ह्यांचा एकत्रित तपास पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, पोलीस उपअधीक्षक गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे करीत आहेत. तपासादरम्यान संशयित आरोपींसह कंपन्यांची सुमारे ११४ कोटी ९३ लाख रूपयांच्या मालमत्ता जप्तीच्या प्रस्तावाला एमपीआयडी कायद्यान्वये (महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण अधिनियम) राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. याशिवाय आणखी मालमत्तांचा समावेश असलेला पुरवणी प्रस्ताव तयार करण्याचे कामही सुरू आहे. याचबरोबर फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांचे जबाब नोंदविण्याचे कामही सुरू आहे.

या प्रकरणात यापूर्वी अनेक संचालक आणि एजंटांना अटक करण्यात आली मात्र, काही प्रमुख संशयित आरोपी देशाबाहेर पसार झाले होते. त्यांच्या विरोधात इंटरपोलमार्फत 'रेड कॉर्नर' नोटीस जारी करण्यात आली. त्यांना भारतात परत आणण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखेने सीबीआय, परराष्ट्र मंत्रालय, केंद्रीय गृह मंत्रालय आणि इंटरपोल यांच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले आहेत.

या प्रयत्नांना पहिले मोठे यश मिळाले. रेड कॉर्नर बजावलेला आरोपी राहुल काळोखे याला फिजीमध्ये शोधून तेथील स्थानिक अधिकार्यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून त्याचे भारतात प्रत्यर्पण करण्यात आले. गुरूवारी त्याला भारतात आणण्यात आले असून, आर्थिक गुन्हे शाखेने मुंबई विमानतळावर त्याचा ताबा घेतला.

दरम्यान या प्रकरणातील संशयित आरोपींना भारतात आणण्यासाठी आणि गुंतवणूकदारांना न्याय मिळवून देण्यासाठी खासदार निलेश लंके यांनीही गेल्या अनेक महिन्यांपासून केंद्र व राज्यातील विविध तपास यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे सांगितले जात आहे.

# जिल्हास्तरीय ऑनलाईन शिक्षण परिषद उत्साहात संपन्न !




**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.३१, शिरपूर (धुळे) :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे तसेच शिक्षण विभाग, जिल्हा परिषद धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने माहे जुलै - २०२६ ची ऑनलाईन शिक्षण परिषद (शिक्षण परिषद पर्व पहिले) संपूर्ण जिल्ह्यात सकाळी ०८.०० ते ११.३० या वेळेत, माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात व नियोजनबद्ध पद्धतीने संपन्न झाली.

या ऑनलाईन शिक्षण परिषदेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. बाबासाहेब बेलदार यांनी पूर्ण वेळ उपस्थित राहून निपुण महाराष्ट्र अभियान या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. सरांनी आपल्या मार्गदर्शनात सर्व शिक्षकांना प्रत्येक वर्ग निपुण करण्याच्या दृष्टीने अधिक जोमाने कार्य करण्याचे आवाहन केले. निपुण बाबत जिल्ह्यातील सर्व शिक्षकांना प्रेरणा दिली. शून्य निपुण टक्केवारी असलेल्या शाळांवरील परिणामकारक भेटी सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणेने कराव्यात. जिल्ह्यातील सुपर निपुण शाळांमधील उत्कृष्ट कार्यपद्धती (लर्शीं ॲिरलीं‌ळलशी) इतर शाळांसाठी उपयुक्त ठरत असतील तर त्याचाही वापर करण्याबाबत सूचित केले. या प्रसंगी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्रभारी प्राचार्या श्रीम. सुचिता पाटील यांनी मूल्यवर्धन, खान अकादमी,निपुण,नाव नव साक्षरता भारत व इतर विषयाबाबत संवाद साधला.

प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. मनिष पवार यांनी ही शिक्षकांना निपुण व इतर प्रशासकीय विषयांबाबत मार्गदर्शन केले. डॉ.मनिष पवार यांनी मा.मुख्य कार्यकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व यंत्रणेस परिणामकारक शाळा भेटीतून निपुण बाबत सूचना दिल्या.

शिक्षण परिषदेच्या विषयपत्रिकेनुसार एकूण सहा सत्रांमध्ये कामकाज पार पडले. शिक्षण परिषदेच्या रूपरेषेचे सादरीकरण ज्ञानप्रकाश फाऊंडेशनच्या स्वप्नजा पाटील यांनी केले. सत्र एक मध्ये निपुण महाराष्ट्रा बाबत जिल्हास्तरीय विश्लेषण व पुढील दिशा या विषयावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या अधिव्याख्याता डॉ. वनमाला पवार यांनी मार्गदर्शन केले. सत्र दोनमध्ये निपुण महाराष्ट्र ॲपच्या तांत्रिक बाबी व डेटा विश्लेषण या विषयावर साक्रीचे केंद्रप्रमुख व ऋडछ माहिती विश्लेषण तज्ज्ञ सुनील जाधव यांनी मार्गदर्शन केले. सत्र तीनमध्ये आशयाच्या आधारे पाठांचे मासिक नियोजन या विषयावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे विषय सहायक श्री. प्रणव पाटील यांनी सादरीकरण केले, तर सत्र चारमध्ये शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण व शैक्षणिक ग्राम सभा आयोजन या विषयावर पुन्हा डॉ. वनमाला पवार यांनी मार्गदर्शन केले. सत्र पाचमध्ये मूल्यवर्धन, पीएमश्री शाळा, विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रम, विद्यांजली व नवीन अभ्यासक्रम यांसारख्या राज्यस्तरीय धोरणात्मक विषयांवर विषय सहायक श्रीम. सुधर्मा सोनवणे यांनी, तर जिल्हास्तरीय प्रशासकीय विषयांवर शिक्षण विभागाच्या (प्राथमिक) विस्तार अधिकारी श्रीम. मनीषा वानखेडे यांनी मार्गदर्शन केले. डायट धुळे या यूट्यूब चॅनेलवरून या संपूर्ण शिक्षण परिषदेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले, ज्याचा लाभ जिल्ह्यातील सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी घेतला.

तसेच जिल्ह्यातील शिक्षण विभागातील सर्व पर्यवेक्षीय यंत्रणा झूम सभेच्या माध्यमातून यात सहभागी झाली होती. शिक्षण परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षण परिषद समन्वयक अधिव्याख्याता डॉ.वनमाला पवार यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांना या कार्यात शिक्षण परिषद बाबत कामकाज करणारे ज्ञानप्रकाश फाऊंडेशनचे प्रतिनिधी विशाल कुंभकर्ण यांनी सहकार्य केले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्हास्तरीय ऑनलाईन शिक्षण परिषद उत्साहात, अतिशय सुंदर व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

# मुख्याध्यापिका वीणा पांडे व सहाय्यक शिक्षक नरेंद्र बुटोलिया यांना भावपूर्ण निरोप




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** खापरखेडा वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे व सहाय्यक शिक्षक नरेंद्र बुटोलिया यांना प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यामुळे मराविम कर्मचारी शिक्षण संस्था व विद्यालयाच्या वतीने ३१ जुलै शुक्रवारला त्यांचा भावपूर्ण निरोप देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती मातेच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविम कर्मचारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ईश्वर राऊत होते. याप्रसंगी प्रशासक सल्लागार मंडळाचे सदस्य मारोती खेडीकर, अशोक उमरेडकर, त्रिवेणी चिखले, नवनियुक्त मुख्याध्यापक गणेश चिखले, प्रतिभा खन्नाडे, संध्या ठाकरे, यामिनी घोरमाडे, सुनील जालंदर, किशोर बक्सरिया, सुनंदा भोगे, जिजा नेघे, दीपक निगोटे, विमल प्रकाश मिश्रा, राम बांते, डॉ.श्रीकांत पारखी, रवींद्र बिजवे, पद्माकर सावलकर, प्रकाश डोर्लीकर, विपीन शर्मा, महेंद्र बागडे, रजनी वाहने, बाबाराव ढोबळे, प्रकाश तवले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष ईश्वर राऊत यांच्या हस्ते मुख्याध्यापिका वीणा पांडे व सहाय्यक शिक्षक नरेंद्र बुटोलिया यांचा शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सोबतच कवी गणेश पांडे व वंदना बुटोलिया यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मुख्याध्यापिका वीणा पांडे म्हणाल्या जीवनात विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणे हाच ध्यास होता सरकारी शिक्षक, कर्मचारी व संस्थेच्या पाठिंब्यामुळेच यशस्वी कार्य पूर्ण करू शकले असे सांगितले. याप्रसंगी उपस्थित अनेक मान्यवरांनी भविष्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुष्पा बढीये यांनी केले, सूत्र संचालन नीरज मिश्रा यांनी केले तर चंद्रकांत मोहोड यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुरेखा चिखले, गीता जालंदर, मनीषा नखाते, प्रमोद इंगळे, संगीता ठाकरे, ममता अंजनकर, अभय मिश्रा, भोला बक्सरिया, किशोर नकोसे, विवेक खन्नाडे यांच्यसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी सहकार्य केले.

# ऐरोली–काटई उन्नत मार्गासाठी बुलेट ट्रेनप्रमाणे मोबदला द्या - नगरसेविका वेदिका पाटील



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, पडले (ठाणे) :** ठाणे विधानसभा मतदारसंघात आज आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान' कार्यक्रमात ऐरोली–काटई उन्नत मार्ग प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर आला.

या कार्यक्रमात महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांची भेट घेऊन मौजे देसाई येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी व जमीनधारकांच्या वतीने लेखी निवेदन सादर करण्यात आले. या मागणीला बळ देत प्रभाग क्र. २९ (ब) च्या नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनीही ३० जुलै रोजी मंत्र्यांना अधिकृत निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या न्याय्य मोबदल्याची मागणी केली आहे.

**नगरसेविका वेदिका पाटील यांच्या प्रमुख मागण्या :**

**१) समान दराने भरपाई :** वाशी गावातील बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ₹ १४,३८० प्रति चौ.मी. दराने मोबदला दिला. मात्र ऐरोली–काटईसाठी फक्त ₹१,४५१ जुना रेडी रेकनर दर दिला जात आहे. त्यामुळे बुलेट ट्रेनप्रमाणे समान दराने न्याय्य भरपाई द्यावी.

**२) २५% वाढीव मोबदला :** प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना एकूण मोबदल्यावर २५% प्रोत्साहनात्मक लाभ मंजूर करावा.

**३)** Multiplier Factor **२ :** सध्या गुणक घटक १ नुसार भरपाई देत आहेत. परिसराचे नगरीकरण आणि वाढते बाजारभाव लक्षात घेऊन गुणक घटक २ लागू करून नुकसानभरपाई द्यावी.

निवेदनात म्हटले आहे की, स्थानिक भूमिपुत्रांचा उपजीविकेचा प्रश्न भूसंपादनाशी निगडीत आहे. अपुरा मोबदला मिळाल्यास त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार आहे.शेतकरी आणि भूमिपुत्रांच्या हक्कांशी कोणतीही तडजोड होऊ देणार नाही. त्यांच्या न्याय्य मोबदल्यासाठी माझा पाठपुरावा यापुढेही सातत्याने सुरू राहील - अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

**उपस्थित मान्यवर :** यावेळी आमदार संजय केळकर, आमदार किसन कथोरे, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधान परिषद सदस्या माधवीताई नाईक, विधान परिषद सदस्य विक्रांत पाटील, भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, उपमहापौर कृष्णा पाटील तसेच विविध शासकीय अधिकारी उपस्थित होते.

**महसूल मंत्र्यांचा निर्णय :** प्रकल्पग्रस्तांच्या भावना लक्षात घेऊन मा. महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब यांनी या प्रकरणी तातडीने जिल्हा अधिकाऱ्यांसोबत बैठक लावण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

# युरियाऐवजी अमोनिअम सल्फेटचा पिकांत वापर करा; कृषी विभागाचे आवाहन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** जिल्ह्यात सध्या १९ हजार ८०८ टन युरिया व ५ हजार ९६६ टन डीएपी उपलब्ध असून, शेतकऱ्यांनी घाबरून जाऊन गरजेपेक्षा अधिक खतांचा साठा करू नये. जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि नत्राचा अपव्यय टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी युरियाऐवजी अमोनिअम सल्फेट या खताचा वापर करावा. हे दुहेरी अन्नद्रव्यासोबत जमिनीचा पीएच नियंत्रित ठेवण्यास आणि पिकांची प्रत सुधारण्यास मदत करते, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

खरीप हंगामात जिल्ह्यात युरिया व डीएपी खतांची मागणी वाढल्याने काही तालुक्यांत तुटवडासदृश स्थिती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी खत पुरवठा, वितरण आणि कृषी निविष्ठांच्या संनियंत्रणाबाबत जिल्हास्तरीय समितीची बैठक झाली.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे, मोहीम अधिकारी नीलेश अभंग, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक संकेत कराळे यांच्यासह, खत उत्पादन कंपनीचे प्रतिनिधी, विक्रेते उपस्थित होते. खरिपासाठी जिल्ह्यात पुरेसे खत उपलब्ध आहे. युरिया खताची मागणी पाहता संरक्षित साठ्यातील खत उपलब्ध करून दिले आहे. जिल्ह्यात पुरेसे खत आहे. ई-पॉस यंत्रणेद्वारे व बायोमेट्रिक पद्धतीने करण्यात येऊन कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, शेतकऱ्यांनी युरिया ऐवजी अमोनिअम सल्फेट या खताचा वापर केल्यास ते अधिक फायदेशीर ठरते, असे सांगण्यात आले.

**रासायनिक खतांचा शिल्लक साठा (टनांत)**

युरिया - १९,८०८, डीएपी - ५,९६६, एमओपी - ६,६८३,एनपीकेएस - ६,६८४,एसएसपी - २४,७५५

---

खरिपासाठी युरियाची मागणी आहे. खतही उपलब्ध आहे. संरक्षित साठा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिला आहे. मात्र तरीही शेतकऱ्यांनी युरिया ऐवजी अमोनिअम सल्फेट पिकांना वापर केल्यास अधिक फायदेशीर ठरेल.

**- सुधीर शिंदे (कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर)**

# बुगेवाडीत १ कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

## आमदार काशिनाथ दाते यांच्या हस्ते भूमिपूजन व लोकार्पण



**दाते यांच्या नेतृत्वामुळे बुगेवाडीच्या विकासाला नवी दिशा**

आमदार काशिनाथ दाते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे बुगेवाडी परिसरातील तब्बल एक कोटी रुपयांच्या विकासकामांना गती मिळाली आहे. या विकासकामांमुळे नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर होऊन गावाच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. विकासाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करणारे आमदार काशिनाथ दाते यांचे नेतृत्व पारनेर तालुक्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

**- विठ्ठल कावरे (उद्योजक)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील बुगेवाडी गावाचा चेहरामोहरा बदलणाऱ्या सुमारे १ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ शुक्रवार, दि.३१ जुलै २०२६ रोजी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते करण्यात आला. रस्ते, पायाभूत सुविधा आणि ग्रामविकासाला चालना देणाऱ्या या कामांमुळे बुगेवाडीसह परिसरातील नागरिकांच्या जीवनमानात मोठा बदल होणार आहे.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले, विकास हीच आपली राजकारणाची खरी ओळख आहे. गावागावांत मूलभूत सुविधा निर्माण करून नागरिकांचे जीवनमान उंचावणे, प्रत्येक वस्तीपर्यंत दर्जेदार रस्ते, पाणी, वीज आणि आवश्यक सुविधा पोहोचविणे हेच माझे ध्येय आहे. मतदारसंघातील कोणतेही गाव विकासापासून वंचित राहणार नाही. जनतेने दाखविलेल्या विश्वासाला न्याय देत विकासाची ही वाटचाल भविष्यातही अधिक वेगाने सुरू राहील.

या विकासकामांमुळे दळणवळण अधिक सुलभ होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तसेच भविष्यातही बुगेवाडीसह संपूर्ण मतदारसंघाच्या विकासासाठी सातत्याने निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, नगरसेवक अशोक चेडे, शहराध्यक्ष राजेंद्र औटी, सुनील गाडगे, नगरसेवक नवनाथ सोबले, शहरप्रमुख कविता औटी यांच्यासह सखाराम बुगे, रामदास कावरे, विठ्ठल कावरे, शिवाजी काळे, संतोष थोरात, इंजि.प्रताप अंबुले, फारुख शेख, नागेश रोहोकले यांच्यासह अनेक मान्यवर, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विकासकामांच्या शुभारंभामुळे बुगेवाडी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते यांचे आभार व्यक्त करत विकासाची ही गती कायम राहावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

# सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानांतर्गत आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या संयुक्त मोहीमा




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३१, नवी मुंबई :** स्वच्छता आणि आरोग्य या परस्परपूरक गोष्टी असून 'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' अंतर्गत स्वच्छ भारत मिशनमार्फत जाहीर करण्यात आलेल्या 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानाच्या अनुषंगाने ३० जुलै ते ५ ऑगस्ट या आठवड्याभराच्या कालावधीत नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभाग आणि घनकचरा व्यवस्थापन विभाग यांच्यामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार संयुक्त मोहीमा राबविण्यात येत आहेत.

या मोहिमेच्या अनुषंगाने दिनांक ३० जुलै रोजी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली तसेच सहा. आरोग्य अधिकारी डॉ.रत्नप्रभा चव्हाण व मुख्य स्वच्छता अधिकारी राजुसिंह चव्हाण व नरेश अंधेर यांच्या नियोजनानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २६ नागरी आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रातील विविध भागांमध्ये स्वच्छता व आरोग्य विशेष मोहीम राबविण्यात आली.

ही मोहीम आज संयुक्तपणे संभाजी नगर, करावेगांव, से-४८ ए, गांधीनगर, नेरुळगांव, बांचोली मैदान ते शांघाई हॉटेल, सारसोळे गांव, शिरवणेगांव, सानपाडा गांव, तुर्भेगांव, श्रमिकनगर खालची व वरची झोपडपट्टी, हनुमान नगर, जुहूगाव, पोलीस पाटील चाळ ते शाळा क्रमांक २७ ते आर के भगत बिल्डींग वाशीगांव, खैरणेगाव, महापेगांव, सम र्थनगर, गांवदेवी वाडी, चिंचआळी पूर्ण, सेक्टर १०ए, कातकरीपाडा, छत्रपती रहिवाशी संघ, यादवनगर, समतानगर, विष्णुनगर, नोसीलनाका, घणसोली गाव, कोपरखैरणेगांव या ठिकाणी राबविण्यात आली.

या मोहिमेमध्ये परिसरातील भंगार साहित्य हटविणे, परिसराची साफसफाई करणे, गटारे तुंबलेली असल्यास ती स्वच्छ करणे, छोट्या प्रमाणातील अभियांत्रिकी कामे करणे, डासअळीनाशक फवारणी करणे तसेच उंदीर / घुशी यांचा उपद्रव असलेल्या ठिकाणी औषध टाकून मुषक नियंत्रणाची कार्यवाही करणे अशा विविध प्रकारे कार्यवाही करण्यात आली. संबंधित भागाचे स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, आरोग्य सहाय्यक यांच्या निरीक्षणाखाली स्वच्छता दूत, हिवताप विभागातील डास प्रतिबंधात्मक औषध फवारणी कर्मचारी तसेच मूषक नियंत्रण कर्मचारी यांनी ही मोहीम अथक काम करून यशस्वीपणे राबविली.तरी या अनुषंगाने नवी मुंबईकर नागरिकांनी आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावा, घरातील व घराभोवतालचे भंगार साहित्य याची योग्य विल्हेवाट लावावी जेणेकरुन आपले नवी मुंबई शहर स्वच्छ, सुंदर व निरोगी राहील असे आवाहन महापौर सुजाता पाटील व महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# सफाई अपनाओ, बिमारी भगाओ अभियानात विद्यार्थी सहभागातून कचरा वर्गीकरण व जलसंचयन संदेश प्रसारण



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३१, नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण२०२५-२६' अंतर्गत 'सफाई अपनाओ,बिमारी भगाओ' या अभियानाच्या अनुषंगाने लोकसहभागावर भर देत स्वच्छताविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक११५, सेक्टर१५, वाशी तसेच नमुंमपा शाळा, सेक्टर२०, नेरूळ गाव याठिकाणी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी ॲन्थोनी वेस्ट हॅन्डलिंग व परिसर सखी विकास संस्था यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना कचरा वर्गीकरणाबाबत माहिती देण्यात आली व वर्गीकरणाचे महत्व पटवून देण्यात आले. त्यासोबतच आरोग्याविषयी चांगल्या सवयी, पावसाळा कालावधीत आरोग्याच्या दृष्टीने घ्यावयाची काळजी याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या घरी कचरा वर्गीकरण होत असल्याची काळजी घ्यावी तसेच इतरांनाही याबाबत माहिती देऊन त्याचे महत्व सांगून प्रोत्साहित करावे असे सांगण्यात आले.त्याचप्रमाणे सध्या पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतून पावसाळी पाण्याचे संचयन करणारे कॅच द रेन अभियान सर्वत्र सुरू असून त्याचीही माहिती देणारा उपक्रम घणसोली सेक्टर ७ येथे नमुंमपा शाळा क्रमांक ७६, ऐरोली सेक्टर ७ येथील जमनाबाई जनार्दन मढवी शाळा त्याचप्रमाणे ऐरोली सेक्टर १७ येथील विसावा सोसायटी घणसोली जिजामातानगर मध्ये राबविण्यात आला. या अंतर्गत पिण्याचे पाणी वाया घालवू नका, त्याकरिता पर्याय म्हणून पावसाचे पाणी साठवा, घरावर पडणारे पावसाचे पाणी पाईपद्वारे साठवणूक टाकीत गोळा करा (रेन वॉटर हार्वेस्टिंग) तसेच वृक्षारोपण करा, कारण झाडे लावल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. अशी महत्वपूर्ण माहिती देण्यता आली.

नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार आणि वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.राजेश म्हात्रे व घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली, 'सफाई अपनाओ,बिमारी भगाओ' अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये नागरिक सहभागावर भर देण्यात येत आहे,तसेच नवी मुंबईचे भविष्य असणारे उद्याचे नागरिक अर्थात विद्यार्थी यांच्यावर स्वच्छता आणि जलबचतीचे संस्कार करण्यावर भर दिला जात आहे.

## थोडक्यात बातम्या

### पुणे गुन्हे शाखेची कारवाई; विक्रीसाठी आणलेल्या चार गावठी पिस्तुलांसह तरुण अटकेत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, पुणे :** शहरातील बेकायदेशीर शस्त्रांच्या तस्करीविरोधात कारवाई करत पुणे गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथक क्रमांक १ ने नऱ्हे परिसरात सापळा रचून एका तरुणाला अटक केली. आरोपीकडून चार गावठी पिस्तुले, मॅगझिन आणि तीन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.

गुप्त माहितीच्या आधारे गोकुळनगर, नऱ्हे परिसरात कारवाई करत असताना पोलिसांनी भूषण उत्तम मोहिते (वय २३) याला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडे चार गावठी पिस्तुले आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ₹२ लाख ६०० रुपये आहे.

प्राथमिक चौकशीत आरोपीने ही शस्त्रे विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली असून, ती महेश कांबळे नावाच्या व्यक्तीकडून मिळाल्याचे सांगितले आहे. याप्रकरणी नऱ्हे पोलीस ठाण्यात आर्म्स ॲक्ट आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, शस्त्र पुरवठ्याच्या साखळीचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे. बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात पुणे पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केली असून, अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### बांडे मळ्यात काळभैरवनाथ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव

#### जागरण गोंधळ, भेदिकभजन, प्रवचन वस्त्र वाटप व महाप्रसाद



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल बांडे मळ्यातील जागृत देवस्थान असलेल्या श्री काळभैरवनाथ मंदिरात गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा गुरुपौर्णिमा उत्सव व शिष्यगण मेळावा मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई निलेश लंके, बाजार समिती संचालक अशोक कटारिया, खरेदी-विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, डॉ. भाऊसाहेब खिलारी, माजी सरपंच सुनीता झावरे, चेअरमन नारायणराव झावरे, राष्ट्रवादीचे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सकाळी अविनाश पारखपद मंडळाचे शाहीर अण्णासाहेब चौरे, शाहीर शांताराम किनकर व संगीत रत्न भाऊसाहेब आंधळे यांच्या भजनांनी वातावरण भक्तिमय झाले. ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज रोकडे यांच्या प्रवचनाला भाविकांनी मोठा प्रतिसाद दिला. दुपारी साकर ठाणगे व बाळासाहेब निवडुंगे यांच्या गोंधळाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी राणीताई लंके यांच्या हस्ते गरजवंतांना वस्त्र वाटप करण्यात आले. महाप्रसादाचे यजमान अशोक चव्हाण, महेश धोंडीराम सर्वज्ञ, (त्र्यंबकेश्वर) जालिंदर प्रभाकर वाबळे, महेश रामदास बांडे यांच्या हस्ते आयोजन करण्यात आले होते. सोहळा यशस्वीतेसाठी सर्व पत्रकार बांधव, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, चेअरमन व्हा चेअरमन, भैरवनाथ मित्र मंडळ, बनाई मित्रमंडळ, नवभारत मित्र मंडळ व शिष्यगण मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. गुरुवर्य रामदास बांडे यांचे शिष्य परिवाराने, भक्तांनी पूजन करून आशीर्वाद घेतले. टाकळी ढोकेश्वर परिसरातील भाविक महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुरुवर्य रामदास महाराज यांनी सर्वांचे आभार मानले.

### संभाजीनगर - अहिल्यानगर - पुणे महामार्ग सहापदरी करा

#### खा.लंके यांची मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, अहिल्यानगर :** खासदार नीलेश लंके यांनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३-एफ (छत्रपती संभाजीनगर- अहिल्यानगर-शिरूर-पुणे) या सुमारे २२० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे सहापदरी सिमेंट-काँक्रीट मार्गात रूपांतर करण्याची मागणी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे. याबाबत त्यांनी नवी दिल्लीत मंत्री गडकरी यांची भेट घेऊन या महत्त्वाच्या मार्गाच्या सर्वांगीण विकासासाठी तातडीने प्रशासकीय मंजुरी देण्याची विनंती केली आहे.

पुणे हे राज्यातील औद्योगिक, शैक्षणिक, वैद्यकीय व आध्यात्मिक केंद्र असून मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातून दररोज हजारो नागरिक या मार्गाने प्रवास करतात. मात्र, शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यानचा राष्ट्रीय महामार्ग अनेक ठिकाणी अरुंद, खड्डेमय व जीर्ण अवस्थेत असल्याने वाहतूक कोंडी, अपघात आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

शिरूर-पुणे फ्लायओव्हर प्रकल्पाला गती दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार व्यक्त करताना, उर्वरित संपूर्ण महामार्गाचाही विकास त्याच धतवर करण्यात यावा, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.या महामार्गावर श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर, श्री ज्ञानेश्वर माऊली मंदिर (नेवासा), शिर्डी, देवगड, थेऊर गणपती, रांजणगाव गणपती यांसारखी प्रमुख तीर्थक्षेत्रे असून वाळूज, नेवासा, अहिल्यानगर, सुपा, रांजणगाव, शिक्रापूर, चाकण आणि तळेगाव ही महत्त्वाची औद्योगिक केंद्रेही या मार्गावर आहेत. त्यामुळे या महामार्गाचे सहापदरीकरण झाल्यास धार्मिक पर्यटन, उद्योग, शेतीमाल वाहतूक, गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.